# समुद्री सस्तन प्राणी जसे की देवमासा, डॉल्फिन (वेडामासा, गादा, गादारेडा, येर, हेर, मामा) किंवा पोर्पोईज (बुलिया) किनाऱ्यावर अडकल्यास किंवा किनारी भागात आढळून आल्यास आपण काय करावे ?

**सर्वप्रथम प्राण्याजवळ जाऊन अंदाज घ्यावा पण तोंडाकडील किंवा शेपटी कडच्या बाजू पासून अंतर राखून पाहणी करावी, प्राणी पाण्यात असल्यास त्याला पोहण्यास किंवा तरंगत राहायला मदत होईल असे पाहावे. त्याचे वरचे (पाठीवरचे) पर आणि श्वसन छिद्र वरच्या बाजूसच राहील ह्याची काळजी घ्यावी.**




आपण अश्या सस्तन प्राण्याला, किनाऱ्याला लागताना पाहिलेत किंवा अगदी प्राण्याचा सांगाडा जरी पाहिलात तरी तातडीने दिलेल्या नंबर वर संपर्क साधावा.




किनाऱ्यावर अडकलेल्या प्राण्याच्या आसपास गर्दी किंवा गोंगाट करणे प्रकर्षाने टाळावे.



समुद्राच्या पाण्याने ओले केलेल्या कपड्याने प्राण्याचे शरीर ओले ठेवण्याचा प्रयत्न करावा, मात्र पाठीवरचे पर आणि श्वसन छिद्र झाकले जाणार नाही ह्याची काळजी घ्यावी. श्वसन छिद्रात पाणी टाकू नये.



श्वसन छिद्रात वाळूचे कण, पाणी किंवा कचरा जाणार नाही ह्याची काळजी घ्यावी तसेच डोळ्यातही कचरा किंवा वाळूचे कण जाणार नाहीत असे पाहावे.



प्राण्याचे पाठीवरचे उभार (पर) किंवा खालचे पर, शेपूट ह्यांना उगाच हिसके देणे किंवा जोर लावून ओढणे टाळावे कारण ह्यामुळे त्यांच्या हाडाला दुखापत होण्याची शक्यता असते.



वाळूच्या किनाऱ्यावर असा सस्तन प्राणी आढळल्यास, प्राण्याच्या खालच्या भागात खळगा करून त्यात समुद्राचे पाणी भरावे जेणेकरून खालील पर पाण्यात राहून, शरीरातील साध्यांवरचा दाब कमी करता येईल.



जर असा सस्तन प्राणी खडकाळ जागी आढळल्यास शक्य असल्यास त्याखाली जाजम/गादी सदृश काहीतरी ठेवण्याचा प्रयत्न करावा जेणेकडून त्याला कमीत कमी इजा पोहोचेल.



प्राण्याला तीव्र ऊनापासून सावली मिळावी ह्यासाठी तंबू सदृश काही उभारता येणे शक्य असल्यास, जरूर करावे.

**संपर्क : ०२२–२२६९ ४९८४ / २२६९ ४९८५**



बुलिया डॉल्फिन देवमासा

हि चिन्हे वर नमूद केलेली कृती कोणत्या सस्तन प्राण्यांना लागू होते, हे दर्शवते.

महाराष्ट्र वन विभाग
कांदळवन कक्ष

BNHS India
CONSERVING NATURE SINCE 1883

MANGROVE FOUNDATION

# पश्चिम किनारपट्टी नजीक आढळणारे समुद्री सस्तन प्राणी




**ह्या प्रजाती वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या अंतर्गत संरक्षित आहेत, त्यामुळे त्यांना पकडणे किंवा त्यांची विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे.**